| MHBI170002472014 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र.६६/२०१४ मधील</u>**<br>**<u>निशाणी क्र.७७ वर आदेश</u>**<br>एकनाथ वि. दादासाहेब<br>(दिनांक १२/११/२०२५) |
|---|---|

**१.** प्रस्तुत अर्ज वादीतर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे तसेच आदेश १ नियम १० दाखल करण्यात आलेला असून त्यामध्ये असे कथन केले आहे की, प्रस्तुत दावा अतिक्रमीत जमीनीचा ताबा मिळणे बाबत तसेच निरंतर मनाई हुकुम मिळणे बाबत दाखल केलेला असून सदर प्रकरणातील नि.क्र.६५ नुसार कोर्ट कमिशनर यांनी त्यांचा अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालानुसार प्रतिवादी यांनी वादीच्या मिळकतीवर २५.५० आर मिळकतीवर अतिक्रमण केल्याबाबत अहवाल दाखल केलेला आहे. सबब, सदर प्रकरणात मुळ दाव्यातील परिच्छेद क्र.१–अ मधील अतिक्रमीत क्षेत्रफळ १३ आर ऐवजी ०० हे २५.५० आर अशी दुरुस्ती करु इच्छीत आहे तसेच दाव्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी १३ आर असा उल्लेख केलेला आहे त्या त्या ठिकाणी ०० हे २५.५० आर अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे. मुळ दाव्यातील परिच्छेद क्र.४ च्या पुढे परिच्छेद क्र.४–अ अर्जात नमूद केल्याप्रमाणे समाविष्ठ करणे आवश्यक आहे. मुळ दाव्यातील विनंती कलम अ मधील मजकूर वगळुन त्या ठिकाणी प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी.

**२.** नि.क्र.६५ वरील कोर्ट कमिशनर यांच्या अहवालानुसार जमीन गट क्र.१९२ मधील वादीच्या मालकी हक्कामध्ये ०१ हे ८२ आर जमीन आहे परंतु वादीच्या प्रत्यक्ष ताब्यामध्ये केवळ ०१ हे ५६.५० आर जमीन असून उर्वरित २५.५० आर क्षेत्रफळावर अतिक्रमण केलेले आहे. मुळ प्रतिवादी क्र.१ आणि २ यांनी अतिक्रमीत क्षेत्र अशोक दादासाहेब मस्के आणि गोविंद दादासाहेब मस्के यांच्या नावे फेरफार क्र.१९९२ आणि १९९३ नुसार हस्तांतरीत केलेले आहे. सबब, अशोक दादासाहेब मस्के व गोविंद दादासाहेब मस्के यांना दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.३ आणि ४ म्हणून समाविष्ठ करणे गरजेचे आहे. सबब, प्रस्तुत अर्जात विनंती केल्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याची तसेच संभाव्य प्रतिवादी क्र.३ आणि ४ यांना दाव्यामध्ये नव्याने समाविष्ठ करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती वादीतर्फे करण्यात आली आहे.

३. वादीतर्फे नि.क्र.६७ नुसार दिनांक ०६.०३.२०२५ रोजी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यचा अर्ज सादर करण्यात आला होता, परंतु तो अर्ज दिनांक ११.११.२०२५ रोजी मागे घेवुन प्रस्तुत अर्ज (निशाणी ७७) दाखल करण्यात आला आहे. नि.क्र.६७ वरील अर्जास प्रतिवादीतर्फे त्यांचे म्हणणे (निशाणी ७२) सादर करण्यात आलेले आहे. नि.क्र.७७ वरील अर्जास प्रतिवादीने या पुर्वी दाखल केलेले म्हणणे (निशाणी ७२) विचारात घेण्यात यावे अशी पुरसिस (निशाणी ७९) प्रतिवादीतर्फे सादर करण्यात आली असून प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, नि.क्र.६५ वरील अहवालानुसार कोर्ट कमिशनरने केलेल्या मोजणी बद्दल प्रतिवादींना नोटीस प्राप्त झाली नसल्यामुळे त्यांना मोजणी बाबत कोणतीही कल्पना नाही.

४. प्रतिवादी क्र.१ हा पॅरलेसिस झालेला असल्यामुळे जागेवरुन हलु शकत नाही, तसेच प्रतिवादी क्र.२ हा नोकरी करीता बाहेरगावी आहे त्यामुळे वादीने मोजणीदाराशी संगनमत करुन नकाशामध्ये २५.५० आर जमीनीवर अतिक्रमण झालेले आहे असे दर्शविलेले आहे. सदर मोजणी दिनांक १६.०७.२०२४, मो.र.क्र.४१/२०२४ मोजणी नकाशा प्रतिवादींना कबुल नाही. सदर मोजणीमध्ये जायमोक्यावरील बीड–परळी राज्य महामार्गाला शासनाने किती जमीन संपादित केलेली आहे, विहिरीचे क्षेत्रफळ, गटाचे विभाजन झाल्यानंतर दोन्ही तुकड्यांचे प्रत्येकी क्षेत्रफळ, बाहेगव्हाण रस्ता, सह–हिस्सेदारांच्या ताब्यात किती जमीन आहे या बाबत कोणताही उल्लेख केलेला नाही. प्रतिवादी क्र.१ व २ यांच्याकडे २५.५० आर जमीन अतिक्रमीत निघत नाही. सबब, प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी तर्फे करण्यात आली आहे.

५. अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहिला, वादीतर्फे विधीज्ञ श्री. एस. ए. लंगे यांचा तसेच प्रतिवादी तर्फे विधीज्ञ श्री. एन. आर. लंगडे यांचा युक्तीवाद ऐकला.

६. प्रस्तुत अर्जाचे आणि अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, सदर प्रकरणामध्ये वादीचा पुरावा दिनांक २२.०९.२०२२ रोजी पुर्ण झालेला आहे. त्यानंतर दिनांक २०.०४.२०२३ रोजी प्रतिवादी यांनी त्यांचा पुरावा बंद केलेला आहे. दोन्ही पक्षकारांचा पुरावा बंद झाल्यानंतर दिनांक २५.०४.२०२३ रोजी दि.प्र.सं. आदेश २६ नियम ९ नुसार अर्ज (निशाणी ६३) सादर केलेला आहे. नि.क्र.६३ वरील

दिनांक १८.१०.२०२३ रोजीच्या आदेशानुसार दिनांक १४.११.२०२४ रोजी मोजणी अहवाल (निशाणी ६५) अभिलेखावर सादर करण्यात आलेला आहे.

**७.** प्रस्तुत अर्जातील कथने तसेच प्रतिवादी यांनी सादर केलेले त्यांचे म्हणणे आणि मोजणी अहवाल (निशाणी ६५) याचे एकत्रीत अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, मौजे बाहेगव्हाण येथील गट क्र.१९२ या संपुर्ण गटाची मोजणी करुन अहवाल सादर करण्यात आल्यानंतर मुळ दाव्यातील अतिक्रमीत क्षेत्रफळ १३ आर या पेक्षा अधिक क्षेत्रफळावर अतिक्रमण झालेले आहे असे वादीचे कथन आहे. वादीच्या विधीज्ञांनी असा युक्तीवाद केलेला आहे की, वादीची एकुण जमीन ०१ हे ८२ आर आहे, परंतु वादीच्या ताब्यात केवळ ०१ हे ५६.५० आर जमीन शिल्लक आहे. नि.क्र.६५ वरील अहवालाचे /नकाशाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, वादीच्या ताब्यामध्ये ०१ हे ५६.५० आर इतकी शेत जमीन आहे. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येत आहे की, वादीच्या ताब्यामध्ये ०१ हे ८२ आर क्षेत्रफळाची जमीन ताब्यात नाही.

८. प्रस्तुत दावा हा अतिक्रमीत जमीनीचा ताबा मिळविणे बाबत असल्यामुळे सदर मोजणी अहवालाव्दारे वादीला त्यांचा दावा सिद्ध करणे आवश्यक आहे. दावा दाखल करते वेळी असलेली परिस्थीती आणि निशाणी ६५ वरील अहवाल सादर झाल्यानंतर निर्माण झालेली परिस्थीती यामध्ये तफावत आहे. दिनांक ०७.०१.२०१२ रोजीची मो.र.क्र.१३७/२०११ (निशाणी ४२) या मोजणीच्या आधारे दावा दाखल केलेला असून त्यामध्ये केवळ वादीच्या क्षेत्रफळापुरती मर्यादित मोजणी करण्यात आली होती. प्रस्तुत दावा अतिक्रमीत जमीनीचा ताबा मिळविण्यासाठी दाखल केला असल्यामुळे वादी आणि प्रतिवादी यांच्या मिळकतीसहीत संपुर्ण गट क्र.१९२ या मिळकतीची संयुक्त मोजणी झाल्याशिवाय अतिक्रमण झालेले आहे किंवा नाही या निष्कर्षाप्रत न्यायालयाला येणे शक्य नसल्यामुळे दाव्याच्या अंतिम टप्प्यामध्ये नि.क्र.६५ वरील मोजणी करण्यात आलेली आहे.

**९.** प्रस्तुत दावा हा अतिक्रमीत जमीनीचा ताबा मिळणेबाबत असल्यामुळे संपुर्ण गट क्र.१९२ या मिळकतीची मोजणी करुन त्याचा अहवाल मागविणे ही जबाबदारी वादीची आहे परंतु वादीने संपुर्ण गटाची मोजणी होण्याकरीता आवश्यक ती पाऊले योग्य त्या वेळी उचललेली दिसून येत नाहीत. प्रस्तुत दावा दहा वर्षांपेक्षा अधिक जुना असून वादीने दाव्याच्या अंतिम टप्प्यामध्ये म्हणजेच दाव्याच्या अंतिम युक्तीवादावेळी दि.प्र.सं. आदेश २६

नियम ९ नुसार अर्ज सादर केलेला आहे. मोजणी अहवाल सादर करण्यात आल्यानंतरही तीन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी नंतर दिनांक ०६.०३.२०२५ रोजी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्याचा अर्ज (निशाणी ६७ – ७७) सादर करण्यात आलेला आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही दाव्याचा अंतिम निर्णय गुणदोषावर होण्यासाठी आवश्यक आहे. वादीची उर्वरित शेत जमीन २५.५० आर ही कोणाच्या ताब्यात आहे ही बाब स्प्ष्ट झाल्याशिवाय प्रतिवादींनी अतिक्रमण केलेले आहे किंवा नाही ही बाब स्पष्ट होणार नसल्यामुळे दाव्यातील वादातीत प्रश्न पुर्णपणे निकाली काढता येणार नाही. सबब, प्रस्तावित दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. प्रस्तावित करण्यास परवानगी दिल्यास प्रतिवादीचे कोणतेही नूकसान होणार नाही.

**१०.** वादीच्या कथनानुसार प्रतिवादी यांनी वाद मिळकत ही अशोक दादासाहेब मस्के आणि गोविंद दादासाहेब मस्के यांच्या नावे फेरफार क्र.१९९२ आणि १९९३ नुसार हस्तांतरीत केलेले आहे, त्यामुळे सदर व्यक्तींना प्रतिवादी क्र.३ व ४ म्हणून दाव्यामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे. सदर दोन्ही व्यक्तींना नोटीस बजावणी झाल्यानंतर ते हजर झालेले आहेत, परंतु जमीन हस्तांतरणाविषयी त्यांच्या जबाबामध्ये कोणताही उल्लेख केलेला नसल्यामुळे वादीने हस्तांतरणाविषयी केलेली कथने त्यांना कबुल असल्याचे दिसून येत आहे. अशोक दादासाहेब मस्के आणि गोविंद दादासाहेब मस्के यांना सदर दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणून सामील करणे आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. वादीने अर्ज सादर करण्यास केलेल्या विलंबासाठी कॉस्ट बसविणे आवश्यक आहे. सबब, पुढील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. प्रस्तत अर्ज **(नि.क्र.७७)** रकक्म रु.१,०००/– सरकार जमा करण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. विनंती प्रमाणे अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. अशोक दादासाहेब मस्के आणि गोविंद दादासाहेब मस्के यांना प्रस्तुत दाव्यामध्ये अनुक्रमे प्रतिवादी क्र.३ आणि प्रतिवादी क्र.४ म्हणून सामील करण्यात यावे.

**४.** सदर आदेश दिनांकापासून १४ दिवसांच्या आत प्रस्तावित दुरुस्ती करावी, आणि दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करण्यात यावी.

**५.** प्रस्तावित दुरुस्ती करण्यात आल्यानंतर अशोक दादासाहेब मस्के व गोविंद दादासाहेब मस्के यांना दाव्याचे समन्स निर्गमित करण्यात यावेत.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2025.11.13 11:17:08 +0530

**दिनांक :** १२/११/२०२५.

**( विष्णु द. गिते )**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, वडवणी,
ता. वडवणी, जि. बीड.

<u>**प्रमाणपत्र**</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. विष्णु द. गिते,**<br>दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,<br>वडवणी. |
| लघुलेखकाचे नाव | :- | राजेश आर. कुलकर्णी. |
| घोषित दिनांक | :- | १२/११/२०२५. |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | १२/११/२०२५. |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | १२/११/२०२५. |